दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज
# रायगड नगरी
मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार
रायगडसह ठाणे, नवी मुंबई, मुंबई, पुणे येथून प्रकाशित
• वर्ष १७ वे • अंक २१३ • MAHMAR/2006/17212 • रायगड • गुरुवार दि.३ नोव्हेंबर २०२२ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## वानखेडेंची चौकशी करणाऱ्या अधिकाऱ्याची बदली

**दै.रायगड नगरी । मुंबई**

'नार्कोटिक्स कन्ट्रोल ब्युरो'चे (एनसीबी) अधिकारी समीर वानखेडे यांची चौकशी करणाऱ्या अधिकाऱ्यांची तातडीने बदली करण्यात आली आहे. ज्ञानेश्वर सिंह यांना मुंबईत मुख्यालय असलेल्या क्षेत्रीय कार्यालयातून हलविण्यात आले आहे. ज्ञानेश्वर सिंह यांच्याविरुद्ध समीर वानखेडे यांनी अलिकडेच राष्ट्रीय अनुसूचित जाती-जमाती आयोगात तक्रार केली होती.

कोर्डेलिया अमली पदार्थ प्रकरणात गैरव्यवहार झाल्याच्या आरोपानंतर या प्रकरणातील बहुचर्चित तपास अधिकारी समीर वानखेडे यांच्याविरुद्ध एनसीबीने दक्षता चौकशी सुरु केली होती.

त्या चौकशी समितीचे प्रमुख ज्ञानेश्वर सिंह होते. त्यांनी मागील वर्षी ऑक्टोबर महिन्यात आठ अन्य अधिकाऱ्यांसह जवळपास १० दिवस वानखेडे तसेच या प्रकरणाशी संबंधितांची चौकशी केली होती. त्यानुसार वानखेडे यांच्याविरुद्ध तीन हजार पानी अहवाल मुख्यालयाकडे सादर केला होता. त्याआधारेच वानखेडे यांची चेन्नईला बदली करण्यात आली.

# पनवेल प्रांताची ईडी मार्फत चौकशी करा ; घबाड हाती लागेल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल प्रांतांकडे माहितीच्या अधिकाराखाली दै.रायगड नगरीचे मुख्य संपादक सुनील पोतदार यांनी २७/९/२०२२ रोजी अर्ज दाखल करून उपविभागीय अधिकारी यांनी जमिनीच्या केलेल्या फेरफारबाबत माहिती मागविली होती. ती माहिती देता येत नाही असे प्रांत कार्यालयातील नायब तहसीलदार यांनी १०/१०/२०२२ रोजी जावक क्र.१२२०१४ ने सुनील पोतदार यांना कळविले होते. माहितीच्या अधिकाराखाली मागविलेली माहिती देणे हे

**छत्रपती शिवरायांच्या पावनभूमीत जन्माला आलेला दै.रायगड नगरी कोणाच्याही दबावाला घाबरत नाही, हे हुलबाजी करणाऱ्या अधिकाऱ्यांनी ध्यानात ठेवावे.**

प्रत्येक अधिकाऱ्याला बंधनकारक असताना केवळ माहिती देण्यास टाळाटाळ करून माहिती दिली गेली नाही आणि पोतदार यांना आपण अपिल करा अशा प्रकारचे कळविले आहे, याचाच अर्थ या प्रकरणात मोठे घबाड असल्यामुळे याची सखोल चौकशी ईडी मार्फत करणे जरुरीचे आहे, तरच ईडीच्या हातात मोठे घबाड लागू शकेल.

दै.रायगड नगरीच्या मुख्य संपादकांना घाबरविण्यासाठी अथवा स्वतःची पापे न्यायालयाच्या समोर येवू नयेत म्हणून पनवेल प्रांतांनी त्यांना ॲड.सचिन जाधव यांच्या मार्फत २/११/२०२२ रोजी नोटीस पाठवून घाबरविण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु मागितलेली माहिती देण्यास असमर्थता आहे व घाबरुन पोतदार यांनी या प्रकरणातून दूर जावे यासाठीच हा केलेला खटाटोप आहे, असे प्रथमदर्शनी दिसते. म्हणून ईडी मार्फत पनवेल प्रांतांची सखोल चौकशी होणे जरुरीचे आहे. जेणेकरून पनवेल प्रांतांनी केलेल्या हेराफेरीचे व शेतकऱ्यांच्या तोंडाला पुसलेल्या पानाची प्रकरणे उघड होवू शकतील. म्हणून ईडीने तात्काळ कारवाई करावी, अशी मागणी शेतकरी वर्गाकडून केली जात आहे.

**उद्याच्या अंकात पनवेल प्रांतांचा पर्दाफाश**
**भाग-३**

## बंद पडलेला दाभोळ प्रकल्प सुरू करण्याच्या हालचाली; राज्य सरकारकडून केंद्राकडे पाठपुरावा

**दै.रायगड नगरी । मुंबई**

रत्नागिरी जिल्ह्यातील बंद पडलेला रत्नागिरी गॅस आणि वीजनिर्मिती प्रकल्प (आधीचा दाभोळ) पुन्हा कार्यान्वित करण्यासाठी राज्य सरकारने हालचाली सुरू केल्या आहेत. यासंदर्भात राज्य सरकारने केंद्र सरकारकडे पाठपुरावाही सुरू केला आहे. १९९५ साली सत्तेवर आलेल्या शिवसेना-भाजप युतीच्या काळात हा प्रकल्प वादग्रस्त ठरला होता.

सध्या एनटीपीसी या कंपनीतील प्रमुख भागधारक आहे, तर राज्य वीज कंपनीचे भागभांडवल खूपच कमी आहे. किफायतशीर दराने अखंडित गॅस पुरवठा झाल्यास या प्रकल्पातून कमी दराने वीजनिर्मिती होऊ शकते. त्यासाठीच केंद्राकडे पाठपुरावा केला जात असल्याचे सूत्रांनी सांगितले.

एकीकडे विजेची वाढती मागणी आणि दुसरीकडे कोळशाचा तुटवडा लक्षात घेता नैसर्गिक वायूवरील हा प्रकल्प सुरू करणे योग्य राहील, असे केंद्रीय ऊर्जा विभागाचेही मत असल्याचे समजते. याबाबत केंद्रीय ऊर्जामंत्री आर. के. सिंग यांच्या अध्यक्षतेखाली देशातील गॅस आधारित वीज प्रकल्पांशी संबंधित एक बैठकही नुकतीच झाली. रत्नागिरीचे पालकमंत्री व उद्योगमंत्री उदय सामंत यांनी यासाठी पुढाकार घेतला आहे.

वीज दरवाढीमुळे फडणवीस सरकारने प्रकल्पातून वीज घेणे बंद केले होते. त्यानंतर कंपनीने रेल्वेबरोबर ५०० मेगावॉटचा करार करून प्रकल्प सुरू ठेवला. सरकारने नैसर्गिक वायूवरील अनुदान बंद केल्याने वीजनिर्मिती महागडी झाली. परिणामी रेल्वेबरोबरचा करारही संपुष्टात आला. महागड्या दरामुळे नवीन वीज खरेदी करार झाला नाही. भाजप-शिवसेना युतीच्या काळात एन्रॉनच्या नावाने वादग्रस्त ठरलेला या प्रकल्पात आतापर्यंत अनेक विघ्ने आली आहेत. आधी दाभोळ वीज प्रकल्प हे नाव असलेला हा प्रकल्प आता रत्नागिरी वीज प्रकल्प नावाने ओळखला जातो. किफायतशीर दरात गॅसची उपलब्धता होत नसल्याने या प्रकल्पातून ६ रुपये ५० पैसे प्रतियुनिट या उच्च दरात वीजनिर्मिती केली जात होती. त्यामुळे रत्नागिरी गॅस आणि वीज कंपनीबरोबर कुणीही वीज खरेदी करार करायला तयार नाही.



## जिल्हाधिकारी कार्यालयावर बल्क ड्रग पार्क विरोधात शेतकऱ्यांचा मोर्चा

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

जिल्हाधिकारी कार्यालयावर बल्क ड्रग पार्क विरोधात शेतकर्यांचा मोर्चा काढण्यात आला. सकाळी सव्वा दहाच्या सुमारास चितामणराव केळकर विद्यालयापासून मोर्चाला सुरवात झाली. सुमारे दोन हजार शेतकरीया मोर्चात सहभागी झाले. शेतकरीभवन, बालाजी नाका, मारुती नाका मार्गे मोर्चा जनरल अरुणकुमार वैद्य विद्यालयासमोर दाखल झाला. या ठिकाणी पोलीसांनी मोर्चा अडवला. मोर्चाचे छोटेखानी सभेत रुपांतर करण्यात आले. प्रकल्प विरा-धी शेतकरी समितीच्या प्रमुख पदाधिकार्यांनी यावेळी मोर्चाला संबोधीत केले.

प्रकल्प राज्याबाहेर जाण्यावरून राजकारण तापले असतांनाच मुरुड आणि रोहा तालुक्यातील प्रस्तावित बल्क ड्रग पार्क विरोधात शेतकर्यांनी अलिबाग येथील जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला. कुठल्याही परिस्थितीत प्रकल्पासाठी जागा देणार नसल्याचा निर्धार त्यांनी यावेळी बोलून दाखवला. यानंतर भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष महेश मोहीते यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने




जिल्हाधिकारी कार्यालयात जाऊन निवेदन दिले. या प्रकल्पाला शेतकर्यांनी सुरवातीप-ासूनच विरोध केला आहे. शेतकर्यांच्या पिकत्या जमिनींबरोबरच राहती घरेही, वाड्या वस्त्याही संपादीत केल्या जाणार आहेत.

रोहा तालुक्यातील भुसंपादन क्षेत्रात बड्यानेत्यांनी जागा जमिनी खरेदी करून त्यामध्ये गुंतवणूक केली आहे. त्यामुळे शेतकर्यांचा विरोध असूनही प्रकल्प पुढे रेटला जात असल्याचा दावा महेश मोहीते यांनी केला. प्रकल्प परीसरात कोणी किती जागांची खरेदी केली आहे. याची यादी माझ्याकडे आहे. लवकरच ती नावे जाहीर करणार असल्याचेही यावेळी सांगीतले.

त्यामुळे शेतकर्यांना बेरोजगारी बरोबरच बेघर होण्याची वेळ येणार आहे. त्यामुळे शेतकर्यांचा या प्रकल्पाला विरोध असल्याचे ॲड. महेश मोहीते यांनी सांगितले. त्याच बरोबर जिल्ह्यात यापुर्वीही एमआयडीसीच्या मार्फत अनेक ठिकाणी भुसंपादन

.../२

## कळंबोली लोखंड पोलाद मार्केटमध्ये साचले गटाराचे पाणी एमएसआरडीसीचे दुर्लक्ष

**दै.रायगड नगरी । कळंबोली**

आशिया खंडातील सर्वाधिक मोठा मानला जाणारा कळंबोली लोखंड पोलाद बाजार प्राचार्य मुख्य प्रवेशद्वारावरच लय मोठे खड्डे पडून बाजूच्या गटाराचे पाणी साचले आहे मार्केटच्या चौकातच खड्ड्यात पाणी साठवून तळे झाल्याने लोखंड बाजारातील व्यापारी वाहन चालक त्रस्त झाले आहेत शासनाने पाण्याबाबत लवकरच निर्णय घेण्याची मागणी व्यापारी संघटनांकडून केली जात आहे मात्र या मुख्य समस्या कडे एम .एस .आर. डी. सी चे पूर्णतः दुर्लक्ष असल्याचा संताप व्यक्त केला जात आहे. असलेल्या पाण्याबाबत व खड्ड्यांबाबत उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे पनवेल तालुकाप्रमुख विश्वास



पेटकर यांनी लेखी पत्रव्यवहार दुरुस्ती करण्याची मागणी केलेली आहे.

कळंबोलीतील लोखंड बाजार हा आशिया खंडातील सर्वाधिक मोठा लोखंड बाजार आहे. या लोखंड बाजार चे विकासाचे काम आता एम. एस. आर .डी. सी. कडे सद्यस्थितीत आहे. या भागात विविध समस्यांना व्यापारी व वाहनचालकांना सामोरे जावे लागते. मार्केटच्या मुख्य प्रवेशद्वारा मध्येच भर चौकात भला मोठा खड्डा पडून आजूबाजूचे गटाराचे पाणी तेथे साचून वाहन चालकांना

.../२

## कर्जत तालुक्यातील कशेळे मंडल अधिकाऱ्याला लाच घेताना रंगेहाथ पकडले

**दै.रायगड नगरी । कर्जत**

अनेकांनावर कारवाई होवून सुद्धा सरकारी कार्यालयात लाच घेण्याचे प्रमाण काही कमी होत नाही आज दि.२ नोव्हेंबर रोजी कर्जत तालुक्यातील कशेळे मंडल अधिकारी याला ७ हजार रुपयांची लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग अधिका-यांनी रंगेहाथ पकडले आहे.

स्टेट बँक ऑफ इंडिया या बँकेचे अधिकृत रिकव्हरी एजंट यांनी बँके कडून सील करण्याकरिता कशेळे येथील मंडल अधिकाऱ्यांकडे गेले असता त्यांच्याकडे पैशांची मागणी केली. त्यापैकी काही रक्कम स्वीकारताना मंडल अधिकाऱ्याला रंगेहात पकडले. ही कारवाई लाचल-ुचपत प्रतिबंधक विभाग ठाण्याच्या पोलीस निरिक्षकांनी केली.

स्टेट बँक ऑफ इंडिया या बँकेचे अधिकृत रिकव्हरी एजंट हे रो हाऊस नंबर ६३, बी इलेजंट फेज - १, इलेजंट कॉम्प्लेक्स, प्लॉट नंबर १९३, नवीन २६२ हा स्टेट बँके कडून सील करण्याकरिता न्यायालयाने आदेश दिला कारणाने कशेळे येथील मंडल अधिकारी दिनेश रमाकांत गुजराथी यांच्याकडे गेले असता त्यांच्याकडे सदरचा रो हाऊस सील करण्यासाठी १५ हजार रुपयांची मागणी केली होती.

याबाबत त्या तक्रारदाराने ठाणे येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालयाकडे तक्रार दिली. या तक्रारीच्या अनुषंगाने ३१ ऑक्टोबर २०२२ रोजी केलेल्या पडताळणी कारवाईत गुजराथी यांनी १५ हजार रुपयांची मागणी करून तडजोडीअंती १० हजार रुपये मागणी केल्याचे निष्पन्न झाले. आज रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस निरीक्षक सुरेश गणपत चोपडे यांनी सापळा रचून ठरलेल्या १० हजार रुपयांपैकी सात हजार रुपयांची रक्कम तक्रारदारांकडून स्वीकारताना रंगेहात पकडले.

एसीबी ठाणे परिक्षेत्र पोलीस अधीक्षक .पंजाबराव उगले,अप्पर पोलीस अधीक्षक अनिल घेरडीकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सुरेश चोपडे, सहाय्यक निरिशक सोंडकर ,पोलीस हवालदार संदेश शिंदे,महिला पोलीस हवालदार दिपाली गणपते यांनी हा सापळा रचला होता.

## संजय राऊतांना दिलासा नाहीच; आता पुढील सुनावणी ९ नोव्हेंबरला

**दै.रायगड नगरी । मुंबई**

शिवसेना खासदार संजय राऊत यांच्या जामीन अर्जावर आज सुनावणी झाली. पण, त्यांना आणखी काही दिवस कोठडीत राहावे लागणार आहे. कारण, त्यांच्या जामीन अर्जावर ९ नोव्हेंबरला सुनावणी होणार आहे.

दरम्यान, संजय राऊत हे कथित पत्राचाळ घोटाळ्याप्रकरणी न्यायलयीन कोठडीत आहेत. संजय राऊत यांनी जामीन मिळण्यासाठी कोर्टात याचिका दाखल करण्यात आली होती. संजय राऊत यांच्या जामीन अर्जावर आज सुनावणी झाली. यावर निर्णय देताना कोर्टाने सुनावणी पुढे ढकलली. आता ९ नोव्हेंबरला त्यांच्या जामीन याचिकेवर सुनावणी होणार आहे.

संजय राऊतांच्या जामिनासंदर्भात ईडीने आज लेखी उत्तर सादर केले. जामिनावरील निकाल न्यायालयाने राखून ठेवला आहे.

दरम्यान, संजय राऊतांना कथित पत्राचाळ घोटाळ्याप्रकरणी ईडीनं अटक केली होती. विशेष म्हणजे प्रविण राऊत आणि संजय राऊत यांच्या जामीनावर एकाच दिवशी ९ नोव्हेंबरला कोर्ट निर्णय देणार आहे. आजच्या सुनावणीवेळी त्यांचे कुटूंबदेखील कोर्टात हजर होते.




दैनिक रायगड नगरीचा 'दिपरंग २०२२' दिवाळी विशेषांक रायगड जिल्हाधिकारी महेंद्र कल्याणकर, रायगड जिल्हा पोलीस अधिक्षक सोमनाथ घार्गे, जिल्हा माहिती अधिकारी मनोज सानप, जिल्हा उपअधिक्षक अतुल झेंडे, जिल्हा पुरवठा अधिकारी मधुकर बोडके यांना सदिच्छा भेट घेवून रायगड नगरीचे संपादक राकेश पितळे, कार्यकारी संपादक अरविंद पोतदार यांनी भेट दिला.

# विकासावर बोलू काही!

काही महिन्यांपूर्वी महाविकास आघाडीचे सरकार असताना आर्थिक अहवाल जाहीर झाला. त्यातली थेट परकीय गुंतवणुकीची आकडेवारी धक्कादायक होती. २०२१-२२ या आर्थिक वर्षात महाराष्ट्रात ४९ हजार कोटी रुपयांची थेट परकीय गुंतवणूक आली. त्याच्या आधीच्या वर्षात महाविकास आघाडीचेच सरकार होते. मात्र, २०२०-२१ या काळात राज्यात एक लाख २० हजार कोटींची गुंतवणूक आली. महाराष्ट्र या गुंतवणुकीत सातत्याने पहिला होता. मात्र, गेल्या वर्षी कर्नाटकाने मागे टाकले. मात्र, यंदा दावोस परिषदेत तीन दिवसांत राज्यात येणाऱ्या ८० हजार कोटींच्या गुंतवणुकीचे प्रत्यक्ष करार झाले. तेव्हा सुभाष देसाई उद्योगमंत्री होते. मात्र, गेले काही दिवस महाराष्ट्रातून गेलेली, न आलेली किंवा येणारी अशा विविध गुंतवणुकींवर चाललेल्या चर्चांमध्ये राजकारण अधिक आणि राज्याच्या अर्थकारणाची व लोककल्याणाची चिंता कमी अशी स्थिती आहे. कोणत्याही राज्यात हजारो कोटी रुपयांचा प्रकल्प येतो, तेव्हा त्याची तयारी कित्येक महिने, कधी कधी दोन-चार वर्षे चालू असते. त्यामुळे, एखादे सरकार गेले की राज्य बुडाले किंवा दुसरे आले की लगेच गुंतवणूक तरारून आली, असे होत नसते. महाराष्ट्रासारख्या प्रगत आणि आजही जगातील उद्योगांना आकर्षक वाटणाऱ्या राज्यातील ही विकासचर्चा किमान एका पातळीवर ठेवण्याची जबाबदारी सर्व राजकीय पक्षांची आणि सर्व माध्यमांचीही आहे. महाराष्ट्राच्या विकासाला कोणी निव्वळ राजकीय आखाड्यात आणून बसवू नये. ते दूरगामी अहिताचे ठरेल. आता पुणे जिल्ह्यामध्ये रांजणगाव येथे जो इलेक्ट्रॉनिक क्लस्टरचा प्रकल्प येऊ घातला आहे, त्याचे स्वागत करायला हवे. 'महाराष्ट्र टाइम्स'ने महाराष्ट्राला इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रातील मोठी गुंतवणूक मिळू शकते, असे वृत्त दिले होते. केंद्रीय राज्यमंत्री राजीव चंद्रशेखर यांच्या घोषणेने ते अचूक ठरले. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या समूह प्रकल्पाचा जो आराखडा सांगितला आहे; तो गुंतवणूक, रोजगार, स्वच्छ उद्योग आणि राज्याचा उद्याचा विकास या सर्व अर्थांनी योग्य आहे. कारखान्यांमध्ये जेवढा प्रत्यक्ष रोजगार निर्माण होतो; त्याचा आनुषंगिक परिणाम म्हणून सात ते आठपट अधिक रोजगारांची निर्मिती होऊ शकते. मात्र, महाराष्ट्रात जे प्रकल्प येणार होते, ते का आले नाहीत किंवा ते न आल्याने राज्याचे किती नुकसान झाले, असे कुणी विचारत असेल तर त्यांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करणे योग्य नाही. तसेच, सरकार ही कायमस्वरुपी व्यवस्था असते आणि तिचे कारभारी बदलले की लगेच आपलीही भूमिका बदलायची, हे राजकीय पक्ष किंवा संघटनांना शोभते. मात्र, आम्हाला काही विचारूच नका, असेही कोणी म्हणू नये. त्यामुळेच, या साऱ्या प्रकरणावर श्वेतपत्रिका काढण्याचा महाराष्ट्र सरकारचा निर्णय स्वागतार्ह आहे. नाहीतरी, सध्याचे निम्मे मंत्री आधीही मंत्री होतेच. तेव्हा, श्वेतपत्रिका काढायला फार वेळ लागू नये. ती तातडीने काढावी. सुबुद्ध महाराष्ट्राला राजकीय चिखलफेकीपेक्षा पुढच्या पिढीच्या क्षेमकल्याणाची चिंता अधिक आहे. तिची दखल या प्रामाणिक व पारदर्शक श्वेतपत्रिकेने घ्यावी. या पलीकडे जाऊन काही बाबींचा विचार करण्याची वेळ आली आहे. गेल्या दशकभरात बहुतेक छोटी-मोठी राज्ये हिरीरीने विकासाच्या स्पर्धेत उतरली आहेत. याचे खरेतर स्वागत करायला हवे. विकासाचे विकेंद्रीकरण आज राष्ट्रीय तसेच महाराष्ट्राच्या अंतर्गत पातळीवरही आवश्यक आहे. दुसरे म्हणजे, उद्योग, कारखाने आणि विकास यांची परिभाषा सर्व राज्यांत समान नसते. म्हणजे, महाराष्ट्रात सुशिक्षित मुलामुलींचे प्रमाण जास्त असल्याने तेथे आयटी, इलेक्ट्रॉनिक्सचा विकास वेगाने होत असेल तर त्यावर लक्ष केंद्रित करायला हवे. याशिवाय, परकीय गुंतवणूक हाच शाश्वत विकासाचा एकमेव मार्ग नसतो. महाराष्ट्रात अनेक जिल्ह्यांतील औद्योगिक वसाहतींची अवस्था अतिशय वाईट आहे. मुंबई-पुणे-नाशिक या सर्वार्थाने महाग झालेल्या त्रिकोणाच्या पलीकडे सर्व जिल्ह्यांत छोटे व मोठे उद्योग वेगाने नेणे, हे खरे आव्हान आहे. गेल्या दोन दशकांत कृषी आधारित उद्योगांचा विकास अपेक्षेइतका झालेला नाही. तो कधी होणार? तसेच, आपल्या भूमीत उद्योग येण्याइतकेच जगात कुठेही काम करू शकेल; असे उत्तम, प्रशिक्षित मनुष्यबळ तयार करणे, हे खरे दीर्घकालीन उत्पादक काम असते. त्यातही आपण कमी पडतो आहोत. विकास व प्रगतीची सारी संकल्पना जर आपण थेट परकीय गुंतवणूक या एकाच निकषाच्या भोवती फिरवत राहिलो; तर ती घोडचूक तर ठरेलच पण आपली उद्या फसगतही होईल. तेव्हा राज्य सरकारने प्रस्तावित श्वेतपत्रिकेचा रोख केवळ आलेली किंवा गेलेली गुंतवणूक एवढ्यापुरता मर्यादित न ठेवता महाराष्ट्राचे पुढच्या तीन-चार दशकांतील सर्वांगीण विकासाचे चित्र सांगण्यावर ठेवावा. 'तुम्ही असताना असे झाले आणि तुमच्यामुळे ते गेले,' या परस्परांवर वाग्बाण सोडणाऱ्या चर्चा वायफळ आहेत. महाराष्ट्र यातच अडकला तर उद्या नव्या संधीही आपण गमावून बसू.

# दूषित वासामुळे स्थानिक पडले आजारी, तळोजा एमआयडीसीतील प्रकार

**दै.रायगड नगरी । पनवेल**



तळोजा एमआयडीसी मधील सोनिया सी. फूड्स प्रा. लि. या कंपनीतून सोडण्यात येणा-या दूषित पाण्यामुळे स्थानिकांना याचा त्रास होत आहे. तसेच दूषित वासामुळे दमा, डोकेदुखी, खोकला, अशक्तपणा असे विविध प्रकारचे आजार या कंपनीमुळे होत आहेत. लवकरात लवकर हे काम थांबवावे नाही, अन्यथा स्थानिक या कंपनीवर कायदेशीर कारवाई करणार आहेत. त्याचप्रमाणे या कंपनी विरूध्द आंदोलन करण्याचा ईशारा श्री राम गावदेवी मित्र मंडळ ढोंगऱ्याचा पाडा यानी प्रदूषण नियामक मंडळाला दिला आहे.

तळोजामधील सोनिया सी. फूड्स प्रा. लि. या कंपनीतून मोठया प्रमाणात येणारया दूषित वासामुळे स्थानिकांना त्रास होत आहे. या कंपनीत फिश मिलिंग केली जाते. त्याच्यापासून तयार होणारी पावडरचा वास मोठया प्रमाणात कंपनीच्या बाहेर येत असतो व या कंपनीतून सीईटीपी प्लॅन्टचे पाणी थेट नाल्यात सोडतात आणि ते पाणी येथील स्थानिकांच्या शेतात व बोअरवेल मध्ये येत असल्याचा आरोप केला जात आहे. त्यामुळे बोअरवेलचे पाणी दूषित होते परिणामी दूषित पाण्याचा वापर केल्यामुळे साथीचे वेगवेगळे आजार होऊ शकतात. हया दूषित पाण्यावर मच्छर येतात व याचा त्रास नागरिकाना होतो. हयामुळे जिवितास हानी होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. त्यामुळे हे घाण पाणी लवकरात लवकर थांबविण्याची मागणी केली जात आहे.

कंपनीतील फिश मिलिंग हे फारच दूषित असून गावांसमोर हे पावडर या कंपनीत तयार करतात. हा त्रास येणा-या जाणा-या व आजूबाजूला असणा-या गावांना सुद्धा सातत्याने होत असतो. या दूषित वासामुळे दमा, डोकेदुखी, खोकला, अशक्तपणा असे विविध प्रकारचे आजार या कंपनीमुळे होत आहेत व लहान मुलांना जास्त प्रमाणात आजार या कंपनीमुळे होतात. नाकावर रुमाल धरून येथून नागरिकांना जावे लागते. त्यामुळे लवकरात लवकर हे थांबवावे व यावर कार्यवाही करावी अशी मागणी श्री राम गावदेवी मित्र मंडळतर्फे करण्यात आली आहे. याबाबत कंपनी प्रशासनासोबत बोलण्याचा प्रयत्न केला असता त्यानी प्रतिसाद दिला नाही. याबाबत प्रदूषण नियामक मंडळाचे डी बी पाटील यांच्याशी संपर्क साधला असता उप विभागीय अधिकारी यांच्याशी बोलतो असे सांगितले

# कोविडसेंटरपासून मुरुडमधील विश्रामगृहाची मुक्ती होणार तरी कधी?

## इमारतीची पार दुरावस्था तर लाखोंच्या साहित्याची अक्षरशः धूळधाण



**दै.रायगड नगरी । कोर्लई**

दि.२२मार्च २०२० पासुन या देशावर कोरोनाचे महामारीचे मोठे संकट आले होते. या वेळी रुग्णालयात रुग्ण सुविधा कमी पडत असल्याने शाळा, महाविद्यालय, शासकीय विश्रामगृह ताब्यात घेऊन या ठिकाणी कोविड केंद्र सुरू करण्यात आली होती. आता हे संकट सरले तरी मुरुडचे शासकीय विश्रामगृह अजून काही कोरोनाच्या कचाट्यातून मुक्त झालेले नाही.आज या इमारतीची पार दुरावस्था झाली असून आतील लाखोंच्या साहित्याची अक्षरशः धूळधाण झाली आहे. त्यामुळे मुरुड जंजिरा हा पर्यटन स्थळ असल्याने येथे अनेक शासकीय अधिकारी, कर्मचारी, पर्यटक येत असतात त्यांच्या निवासाची गैरसोय होत आहे. त्यामुळे हे शासकीय विश्रामगृह कोरोनाच्या कचाट्यातून मुक्त होणार कधी?असा सवाल उठत आहे.

कोरोनाची लाट उसळली होती ती आता ओसरली आहे. सर्व नियम शिथील करण्यात आले आहेत. सर्व पर्यटन स्थळे पर्यटकांसाठी खुले करण्यात आले आहेत. सर्व शाळा, महाविद्यालय पुर्ण पणे सुरू झाली आहेत. पर्यटक मुरुडला येऊ लागले आहेत. मुरुड जंजिरा किल्ला पाहण्यासाठी शासकीय अधिकारी, कर्मचारी सुद्धा येत आहेत. त्यांच्या निवासाची व्यवस्था ही शासकीय विश्रामगृहात होत नसल्याने त्यांना न थांबताच परतावं लागत आहे. तरी हे मुरुडचे शासकीय विश्रामगृह अद्यापही कोरोनाच्या कचाट्यातून मुक्त झालेले नसल्याने हे विश्रामगृह कोरोनाच्या कचाट्यातून कधी मुक्त होणार ? असा सवाल उठत आहे.

शासनाच्या संबंधित महसूल, आरोग्य व सार्वजनिक बांधकाम खात्याने यात लक्ष पुरवून सार्वजनिक बांधकाम खात्याचे विश्रामगृह लवकरात लवकर खुले व्हावे.अशी भावना व्यक्त केली जात आहे. दरम्यान, मुरुड तहसीलदार रोहन शिंदे यांनी शहरातील खाजगी डॉक्टर यांच्याकडून उपलब्ध झालेले बेडस त्यांना परत करुन, उर्वरीत लोकसहभागातून प्राप्त झालेले बेडस व इतर साहित्य आपल्या ताब्यात घेवून, आपल्या अधिपत्याखालील प्राथमिक आरोग्य केंद्रास दिल्यास सदरचे साहित्य सुस्थितीत राहून वापरास उपयोगी येईल.

तसेच शासकीय विश्रामगृह उपभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग मुरुड यांस तातडीने खाली करुन त्यांच्या ताब्यात देता येईल. असे तालुका आरोग्य अधिकारी यांना कळविण्यात आले असून सदर पत्राच्या प्रती जिल्हा आरोग्य अधिकारी व सार्वजनिक बांधकाम विभागाचे उप अभियंता यांस माहिती व उचित कार्यवाहीसाठी देण्यात आल्या आहेत.

# प्रादेशिक भूमीजल व्यवस्थापन समस्या या विषयावर केंद्रीय भूमीजल बोर्ड, नागपूरच्या वतीने तीन दिवसीय प्रशिक्षणाचे आयोजन

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

केंद्रीय भूमीजल बोर्ड जलशक्ती मंत्रालय, जलसंपदा, नदी विकास आणि गंगा संरक्षण विभाग, भारत सरकार यांच्या वतीने नॅशनल ॲक्विफर मॅपिंग प्रकल्पांतर्गत Capacity Building योजनेचा एक भाग म्हणून आणि जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या मार्गदर्शनाखाली दि.२ ते ४ नोव्हेंबर २०२२ या कालावधीत अलिबाग नगरपरिषद येथे प्रादेशिक भूमीजल व्यवस्थापन समस्या या विषयावर ३ दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

भूजल संवर्धन संबंधित सर्व पैलू आणि समस्यांचे मूलभूत ज्ञान देणे आणि जलचर व्यवस्थापन योजना तयार करणे आणि महाराष्ट्र राज्यात त्याची अंमलबजावणी करणे, हे प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्दिष्ट आहे. केंद्र/राज्य सरकारच्या अधिकाऱ्यांना आणि पाणी विकास आणि व्यवस्थापनाशी संबंधित शैक्षणिक/ सामाजिक संस्थांना हे प्रशिक्षण दिले जाते. या प्रशिक्षणाचे उद्घाटन आज दि.२ नोव्हेंबर रोजी संपन्न झाले. यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे अपर जिल्हाधिकारी अमोल यादव यांनी उपस्थितांना मोलाचे मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी केंद्रीय भूमीजल बोर्ड, नागपूरने तयार केलेल्या प्रशिक्षण मॉड्यूलचे प्रकाशन केले. तसेच भूजलाचे महत्त्व सांगून पाण्याची बचत ही प्रत्येक व्यक्तीची जबाबदारी आहे, केवळ बचत करणेच नाही तर भूजलाची गुणवत्ता हा देखील महत्वाचा घटक आहे ज्याकडे आपण लक्ष केंद्रित केले पाहिजे, असेही ते म्हणाले. केंद्रीय भूमीजल बोर्डाचे श्री.अभय निवसरकर यांनी उपस्थितांचे स्वागत केले आणि प्रशिक्षणाचे उद्दिष्ट स्पष्ट केले. शेवटी अध्यक्षीय भाषण वैज्ञानिक डी आणि कोर्स समन्वयक, केंद्रीय भूमीजल बोर्ड, नागपूरचे कार्तिक डोंगरे यांनी केले. या प्रशिक्षण कार्यक्रमास कृषी उपसंचालक दत्तात्रय काळभोर, अलिबाग नगरपरिषद मुख्याधिकारी श्रीमती अंगाई साळुंके, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणाचे कोकण विभाग उपसंचालक श्री.बी.आर.टोणपे व वरिष्ठ भूवैज्ञानिक श्री.एच.एम.संगनौर हे उपस्थित होते. यावेळी त्यांनी टियर-२ प्रशिक्षणाच्या संकल्पनेचे आणि कल्पनेचे कौतुक केले आणि भूजल क्षेत्रातील क्षमता वाढीसाठी ज्ञानाची देवाणघेवाण करण्याबद्दल समाधान व्यक्त केले. या कार्यक्रमात वन विभाग, पाटबंधारे विभाग, कृषी विभाग, भूवैज्ञानिक सर्वेक्षण आणि विकास संस्था, डीजीएम इत्यादी विविध राज्य शासकीय कार्यालयातील अधिकारी-कर्मचारी सहभागी झाले होते.

# एससीडीपीएम मोहिमे अंतर्गत जेएनपीए मध्ये पीपीपी तक्रार निवारण बैठक संपन्न

**दै.रायगड नगरी । उरण**

केंद्रीय बंदरे, जहाज वाहतूक आणि जलमार्ग मंत्रालयाच्या दिशानिर्देशानुसार जेएनपीएने आपल्या भागधारकांच्या जास्तीत जास्त तक्रारींचे निराकरण अग्रक्रमाने करने व उर्वरित तक्रारींसाठी विशिष्ट काल मर्यादेसह कृती आराखडा तयार करण्याच्या उद्देशाने 'पीपीपी तक्रार निवारण बैठक' आयोजित केली होती. सदर बैठक जेएनपीएचे अध्यक्ष संजय सेठी यांच्या अध्यक्षतेखाली पोर्टच्या विविध भागधारकांची व सवलतीप्राप्त बर्थ ऑपरेटरच्या प्रतिनिधींच्या उपस्थीतीत उपस्थितीत पार पडली.

या वेळी बंदर व्यवस्थापनाने टर्मिनल ऑपरेटर्सनी उपस्थित केलेल्या बहुसंख्य समस्यांचे निराकरण केले आणि त्यांनी मांडलेल्या विविध सूचनांचा स्विकार केला. जेएनपीए सार्वजनिक-खाजगी भागीदारी मॉडेलच्या केंद्रस्थानी आहे कारण देशाची अर्थव्यवस्था खुली झाल्यानंतर सार्वजनिक क्षेत्रातील खाजगी कंपन्यांचा हा देशातील पहिलाच प्रयोग होता. जेएनपीए भारतातील पहिले शंभर टक्के जमीन मालकी अस-लेले प्रमुख बंदर आहे. बैठकीदरम्यान, भागधारकांना टर्मिनल ऑपरेटर्समध्ये कार्यक्षमता वाढवण्यासाठी मौल्यवान आणि रचनात्मक सूचना प्रस्तुत करण्याचे आवाहन करण्यात आले.

जेएनपीएने भारत सरकारच्या 'प्रलंबित बाबींचे निराकरण विशेष मोहीम' अंतर्गत अनेक उपक्रम हाती घेतले आहेत. केंद्रीय बंदरे, जहाज वाहतूक आणि जलमार्ग मंत्रालयाने प्रलंबित बाबींचे निराकरण करने आणि स्वच्छता सुधारणे हे मुख्य फोकस क्षेत्र म्हणून निश्चित केले आहेत, ज्यामुळे उत्कृष्ट रेकॉर्ड व्यवस्थापन, कार्य क्षमता सुधारणे, पारदर्शकता वाढवणे आणि शाश्वत भविष्यासाठी मदत मिळेल. विशेष मोहीम २.० स्वच्छता संस्थागत बनविने आणि प्रलंबित बाबींचे निराकरण करने हे केवळ प्रासंगिक नसून दैनंदिन कामकाजात सवयीचा भाग म्हणून आत्मसात करणे आहे.



श्री स्वामीनारायण गुरुकुल राजकोट संस्थानच्या माध्यमातून कामोठे येथे राजकोट गुरुकुलच्या नूतन शाखेचे भूमिपूजन १३ नोव्हेंबर रोजी वाशी येथील सिडको एक्झिबिशन सेंटर येथे होणार असून या कार्यक्रमाचे निमंत्रण माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांना देताना श्री स्वामीनारायण गुरुकुल राजकोट संस्थानचे साधू वीरकटवंदासजी, साधू निर्वेदश्वरउपदासजी, विश्वस्त मेघजी भाई, माजी नगरसेवक रामजी बेरा, खारघर व्यापारी सेलचे अंबाभाई पटेल.

पृष्ठ क्र.१ वरुन...

# जिल्हाधिकारी कार्यालयावर बल्क ड्रग पार्क विरोधात शेतकऱ्यांचा मोर्चा

करण्यात आले आहे. पण त्याठिकाणी प्रकल्प आलेले नाहीत. शेती गेली आणि प्रकल्प आले नाही, रोजगार मिळाले नाहीत आणि लोक देशोधडीला लागले त्यामुळे या कुठल्याही परिस्थितीत प्रकल्पासाठी जागा देणार नसल्याचा निर्धार यावेळी शेतकर्यांनी बोलून दाखवला. या प्रकल्प विरोधी आंदोलनाचे मी सुरवातीपासून नेतृत्व केले आहे. शेतकर्यांची बाजू मांडण्यासाठी केंद्रीय मंत्र्यांची वेळोवेळी भेट घेतली आहे. त्यामुळे सत्ता बदल झाला म्हणून आता भुमिका बदलणे शक्य ठरणार नाही. मी कालही शेतकर्यांसोबत होतो उद्याही राहीन, पदाचा राजीनामा दिला आहे. वेळ पडली तर पक्ष सदस्यत्वाचा राजीनामा देण्याची माझी तयारी आहे. पण शेतकर्यांची साथ सोडणार नाही अशी जाहीर भुमिका मोहीते यांनी यावेळी मांडली.

# कळंबोली लोखंड पोलाद मार्केटमध्ये साचले गटारीचे पाणी एमएसआरडीसीचे दुर्लक्ष

दिव्य प्राणायाम करून वाहन चालवावे लागते. भर चौकात साचलेल्या तळ्यांमधून सिमेंट काँक्रीट मधील लोखंडाच्या सळ्यया सुद्धा बाहेर आल्या आहेत. त्या वाहनांच्या टायरला लागून वाहन निकामी होण्याचे प्रकार ही सर्रास घडत आहेत.भले मोठे ट्रेलर व टँकर तसेच अवजड वाहनांना तारेवरची कसरत करून वाहन न्यावे लागते .या मार्केटमध्ये टोल टॅक्स ही तितकाच वसूल केला जात आहे. मात्र एम एस आर डी. सी चे या मुख्य समस्या कडे दुर्लक्ष केले जात असल्याने व्यापाऱ्यांनी संताप व्यक्त केला आहे .याबाबत पनवेल महापालिकेचे प्रभाग अधिकारी सदानंद कवठे यांनी पत्रव्यवहार करून सदरची बाब निदर्शनास आणून दिली आहे. एम एस आर डी सी च्या अधिकारी कोटकर मॅडम यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी परमार कन्स्ट्रक्शन शी संपर्क करा असे सांगितले. परमार कन्स्ट्रक्शन कंपनीशी संपर्क साधला असता तेथील अभियंते म्हणाले की कळंबोली जवळील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची जलवाहिनी जमिनीखाली खाली फुटल्याने सदरचे पाणी तिथे येत आहे. याबाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाशी पत्रव्यवहारही केला आहे .जोपर्यंत पाण्याची गळती थांबवली जात नाही तोपर्यंत रस्ता दुरुस्तीचे काम करता येत नसल्याचे सांगितले.कळंबोलीतील लोखंड बाजारातील असलेल्या तळ्या बाबत उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे पनवेल तालुकाप्रमुख विश्वास पेटकर यांनीही पुढाकार घेऊन सदरची समस्या मार्गी लावण्यासाठी लेखी पत्रव्यवहार करून प्रशासनाला जाग आणून दिलेली आहे. मात्र वाहन चालक व व्यापाऱ्यांना पावसाळा संपूनही पावसाळ्याचे दिवस भोगावे लागत आहेत .एम. एस. आर. डी. सी. ने याबाबत त्वरित कारवाई करण्याची मागणी विश्वास पेटकर यांनी केली आहे.

# जिल्हा वार्षिक योजनांच्या कामांचे प्रस्ताव तातडीने पाठवावेत : जिल्हाधिकारी

**दै.रायगड नगरी । ठाणे**

जिल्हा नियोजन समितीमार्फत देण्यात येणाऱ्या सन २०२२-२३ या वर्षातील जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण विशेष घटक योजनेतील कामे ही वेळेत पूर्ण होऊन शंभर टक्के निधी खर्च होण्यासाठी जिल्ह्यातील संबंधित कार्यान्वयिन यंत्रणांनी वेळेत प्रशासकीय मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करावेत, असे निर्देश जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी आज येथे दिले.

जिल्हा नियोजन समितीच्या आढावा बैठकीच्या पूर्वतयारीसंदर्भात जिल्हाधिकारी श्री. शिनगारे यांच्या अध्यक्षतेखाली आज जिल्ह्यातील यंत्रणांची बैठक झाली. यावेळी जिल्हा नियोजन अधिकारी सुनील जाधव, जिल्हा समाज कल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त समाधान इंगळे यांच्यासह विविध यंत्रणांचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. यापुढे जे अधिकारी जिल्हास्तरीय सभेत गैरहजर असतील त्याच्यावर योग्य ती कारवाई करण्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी आदेशित केले.

जिल्हा नियोजन निधीतून आतापर्यंत झालेल्या खर्चाचा तसेच कामांचा यंत्रणानिहाय आढावा जिल्हाधिकारी महोदयांनी घेतला. सन २०२२-२३ या वर्षासाठी यंत्रणांना देण्यात आलेल्या निधीनुसार कामांसाठीचे प्रशासकीय मान्यतेचे प्रस्ताव अद्याप बऱ्याच प्रमाणात अप्राप्त आहेत. हे प्रस्ताव शुक्रवारपर्यंत जिल्हा नियोजन समितीकडे पाठविण्याचे निर्देश श्री. शिनगारे यांनी यावेळी दिले.

श्री. शिनगारे म्हणाले की, जिल्ह्याच्या विकासासाठी तसेच जिल्ह्यातील नागरिकांपर्यंत योजना पोचविण्यासाठी जिल्हा वार्षिक योजनांचा निधी दिला जातो. हा निधी वेळेत त्यांच्यापर्यंत पोचविणे ही यंत्रणांची जबाबदारी आहे. आतापर्यंत अनेक विभागांचे प्रशासकीय मान्यतेचे प्रस्ताव आलेले नाहीत. वेळेत प्रस्ताव प्राप्त झाले नाही आणि निधी अखर्चित राहिला तर त्याची जबाबदारी संबंधित विभागप्रमुखांवर ठेवली जाईल. त्यामुळे या विभागानी तातडीने आराखडे तयार करून प्रशासकीय मान्यतेसाठी प्रस्ताव पाठवावेत. तसेच या वर्षीची प्रस्तावित कामे ही डिसेंबर अखेरपर्यंत पूर्ण होतील याकडेही यंत्रणा प्रमुखांनी लक्ष द्यावे. पुढील वर्षी सन २०२३-२४ साठी कोणती कामे घेण्यात येणार आहेत, याचाही आराखडा तयार करण्याच्या सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

जिल्ह्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांसाठी इमारतीचे बांधकाम, प्रशिक्षण कार्यशाळा आदींचा समावेश असलेला बृहत् आराखडा सादर करण्याचे निर्देशही जिल्हाधिकारी श्री. शिनगारे यांनी यावेळी दिले. जिल्हा नियोजन अधिकारी श्री. जाधव व श्री. इंगळे यांनी आतापर्यंत आलेले प्रस्ताव, दिलेल्या प्रशासकीय मान्यता व वितरित निधींची माहिती सादर केली.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## २४ वर्षीय तरुण बेपत्ता

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मोबाईल दुरुस्ती करता तक्का, पनवेल येथे जातो असे सांगून घरातून निघून गेलेला २४ वर्षीय आशिष हरिदास वनवे हा घरी परत न आल्याने तो हरवल्याची तक्रार खांदेश्वर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

त्याची उंची पाच फूट, दहा इंच, रंग गोरा, अंगाने मजबूत, उजव्या हातावर ओम व मंत्र गोंदलेला आहे. त्याच्या उजव्या हातात स्टीलचे कडे असून अंगात चॉकलेटी रंगाचा फुल बाह्यांचा टी-शर्ट, त्यावर पांढरे पट्टे आहेत. पायात निळ्या रंगाची जीन्स पॅन्ट व पायात स्लीपर घातली आहे. या तरुणाबाबत अधिक माहिती असल्यास पोलीस नाईक नवनाथ लवटे यांच्याशी संपर्क साधावा.

## नाईक-अंतुले महाविद्यालय म्हसळा येथे राष्ट्रीय एकता दिवस संपन्न

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

कोकण उन्नती मित्र मंडळाचे वसंतराव नाईक कला, वाणिज्य महाविद्यालय आणि बॅरिस्टर ए. आर. अंतुले विज्ञान महाविद्यालय म्हसळा प्रभारी प्राचार्य प्रा. दिगंबर टेकळे यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने आज भारताचे पहिले गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्ताने सकाळी ७.४५ वाजता राष्ट्रीय एकतेची शपथ घेण्यात आली. सदर प्रसंगी एन. एस. एस. कार्यक्रम अधिकारी प्रा. सुमित चव्हाण व श्री. अखलाक मुकादम हे उपस्थित होते.

त्यानंतर महाविद्यालय ते ए. आय. जे. हायस्कूल म्हसळा पर्यंत एकता दौडचे आयोजन करण्यात आले होते. ए. आय. जे हायस्कूल म्हसळा येथे वसंतराव नाईक कला, वाणिज्य महाविद्यालय आणि बॅरिस्टर ए. आर. अंतुले विज्ञान महाविद्यालय म्हसळा समवेत म्हसळा तहसील कार्यालय, म्हसळा पोलीस ठाणे, म्हसळा नगरपंचायत कार्यालय, म्हसळा शहरातील सर्व हायस्कूल यांनी सामुदायिक राष्ट्रीय एकता शपथ घेतली. त्यानंतर महाविद्यालय भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान इंदिरा गांधी यांचा स्मृतीदिन आणि भारताचे पहिले गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती साजरी करण्यात आली. सदर प्रसंगी प्रा. सुमित चव्हाण, सौ. समेल मॅडम, सुभाष साळवे, वैभव कळस, ऋत्विक बोरकर, श्रुती वेटकोळी, सुशांत शिंदे, अखलाक मुकादम, डी. टी. पवार हे उपस्थित होते.

# पिडब्ल्यूडीच्या जागांवर अतिक्रमणे, १५० हुन अधिक जणांना नोटीसा पाठविल्या

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुक्यातील सार्वजनिक बांधकाम खात्याच्या रस्त्यालगत शेकडो अतिक्रमण झालेले दिसत आहेत. मात्र त्यांच्यावर गेली कित्येक वर्षापासून कारवाई करण्यात आलेली नसल्याने कारवाई करण्याची गरज आहे. सुकापुरपासून पुढे रस्त्यालगत मोठ्या प्रमाणात अतिक्रमणे केलेली असून सार्वजनिक बांधकाम विभागाने १५० हून अधिक जणांना नोटीसा पाठवल्या आहेत.यावर लवकरच कारवाई होणार असल्याचे अधिकाऱ्यानी सांगितले आहे.


पनवेल परिसर झपाट्याने बदलत चालला आहे. सुकापूर, आकुर्ली, चिपळे, नेरे आदी परिसरात मोठ्या प्रमाणात लोकवस्ती देखील वाढत चालली आहे. त्याचा परिणाम येथील सार्वजनिक बांधकाम खात्याच्या रस्त्यालगत अनेक हातगाड्या, लाद्यांच्या दुकानापासून बेड, सोफा, बेकायदेशीर घरे, पक्षी बांधकामे, गाड्या धुण्याचे सेंटर, मटन, चिकन दुकाने, पाणीपुरी स्टोल उभारले गेले आहेत. यापूर्वी सार्वजनिक बांधकाम विभागाचे या अतिक्रमणाकडे दुर्लक्ष होताना दिसून आले आहे. मात्र सुरु असलेल्या वर्षात कारवाईला सुरुवात होणार आहे. येथील रस्त्याला माथेरान रस्ता असे संबोधले जाते. सुकापूर गावापासूनचा परिसर नैनामध्ये येत असून आकुर्ली, चिपळे, कोप्रोली आदी परिसरात सार्वजनिक बांधकाम खात्याच्या जागेवर अतिक्रमणे उभी राहिली आहेत. यातील बहुतांशी परप्रांतीय आहेत. त्यांच्याकडून काही नागरिक भाडे वसूल करत असल्याचे समोर आले आहे. सार्वजनिक बांधकाम खात्यातर्फे माथेरान रस्त्यावरील जागा १९६५ ते १९७० च्या दरम्यान हस्तांतर केली असल्याची माहिती देण्यात आली आहे. मात्र अनेक ठिकाणी अतिक्रमणे झालेली दिसत आहे. १५० हुन अधिक जणांना नोटीसा पाठविल्या असून लवकरच कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती पिडब्ल्यूडीच्या अधिकाऱ्यांनी दिली. मोठ्या प्रमाणावर अतिक्रमणे करण्यात आल्याने येथे दररोज वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागते. अतिक्रमण स्वतहुन काढण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

कित्येक वर्षापासून कारवाई करण्यात आलेली नसल्याने अतिक्रमणांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. या जागेवर अतिक्रमणे केलेली असल्यामुळे ही अतिक्रमणे करणाऱ्यांना नोटीसा पाठवण्यात आलेली आ- हेत. रस्त्यालगतच्या जागा अनेक धनदांडग्यानी बळकावल्या आहेत. यात सार्वजनिक बांधकाम खात्याची जागा देखील सोडण्यात आलेली नाही. या जागेचा खासगी वापर केला जात आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग लवकरच या अतिक्रमणावर कारवाई करणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

# रोहा सुकेळी खिंडीमध्ये घडले रानगव्याचे दर्शन

**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

रायगड जिल्ह्यातील रोहा तालुक्यातील सुकेळी खिंड येथे येथे दिनांक २८ ऑक्टोबर रोजी सायंकाळी पाचच्या सुमारास रानगव्याचे दर्शन घडले.



याबाबत सविस्तर वृत्त असे की रायगड जिल्हातील मुंबई गोवा महामार्गांवर असणाऱ्या सुकेळी खिंडीमध्ये २८ ऑक्टोबर रोजी पाचच्या सुमारास रस्त्याच्या बाजूला नर जातीचा रानगवा दिसला यावेळी नागोठणे पोलीस ठाण्याचे पेट्रोलिंग साठी ड्युटीवर असणारे नागोठणे पोलीस ठाण्याचे कार्यतत्पर कर्तव्यदक्ष पोलीस जनार्धन मेंगाळ यांना दिसला पोलीस नाईक जनार्धन मेंगाळ यांनी प्रसंगावधान राखून रस्त्याने येणाऱ्या जाणाऱ्या लोकांना जागृत केले. तसेच याबाबत आपल्या मोबाईल मध्ये शूटिंग करून पत्रकारांना सुद्धा माहिती देण्यात आली.

रानगवा रागीट प्राणी तसेच हिंस्र प्राणी असल्याचे बोलले जात आहे.पोलीस जनार्दन मेंगाळ यांनी येणाऱ्या जाणाऱ्या लोकांना जागरूक केले अन्यथा मोठा अनर्थ घडला असता. याबाबत सहाय्यक वनसंरक्षक अलिबाग संजय कदम यांच्याशी संपर्क साधला असता ज्या भागामध्ये गवा आढळला त्या भागामध्ये आम्ही वनाधिकाऱ्यांना पाठवून योग्य त्या सूचना देऊन तो मनुष्य वस्तीत येणार नाही याची काळजी घेऊ. तसेच या ज्या भागात दिसला त्या भागामध्ये गस्त घालून कोणत्याही प्रकारची जीवित हानी होणार नाही याची काळजी घेऊ. तसेच परिसरातील लोकांनी सुद्धा यापासून सतर्क राहण्याचे आवाहन केले असून जर त्या परिसरामध्ये गवा दिसला तर संबंधित वनविभागाला कळविण्याचे आवाहन सहाय्यक वन संरक्षक अलिबाग संजय कदम यांनी केले आहे.

याबाबत कोणताही अनुचित प्रकार घडणार नाही याची घेऊ अशी माहिती देण्यात आली. रान गवा खूप हिंस्र रागीट असून प्राणी असून त्याच्या जवळ न जाता त्याची छेडछाड न करता त्याच्यापासून दूर राहून तत्काळ वन विभागाशी संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे तसेच प्रसंगावधान राखून जनतेला सावध करणाऱ्या पोलीस जनार्धन मेंगाळ यांचे सुद्धा अभिनंदन केले आहे.

रानगवा प्राणी आपल्या रायगड जिल्ह्याच्या जंगलामध्ये सहसा आढळत नाही मात्र पहिल्यांदाच रायगडच्या जंगलामध्ये रानगवा दिसल्याने जनतेने सुद्धा आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

# वायफायचा पासवर्ड दिला नाही म्हणून केली हत्या

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कामोठे येथे वायफायचा पासवर्ड दिला नाही म्हणून १७ वर्षीय तरुणाची २८ ऑक्टोबर रोजी हत्या करण्यात आली. याप्रकरणी कामोठे पोलिसांनी राज संतोष वाल्मीकि (वय १९) व रविंद्र राजेश अटवाल ऊर्फ हरियाणी (वय २२) या दोन आरोपींना अटक केली. त्यांना न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. कामोठे, सेक्टर १४ येथील सलमान खान याच्या पान शॉप वर १७ वर्षीय विशाल मौर्य आला होता. यावेळी रवींद्र उर्फ हरियाणी व राज हे पान खाण्यासाठी आले होते. यावेळी त्यांनी विशाल मौर्य याच्याकडे हॉटस्पॉट वायफायचा पासवर्ड मागितला. तो देण्यास विशालने नकार दिला. त्यामुळे त्यांच्यात भांडण झाले. दोघांनी मिळून विशाल याला मारहाण केली. व त्यानंतर त्याच्या पाठीवर चाकू भोसकून त्याला ठार मारले. व ते दोघेही पळून गेले. याबाबत कामोठे पोलीस ठाण्यात हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आल्यानंतर वरिष्ठ पोलीस निरीक्षक स्मिता जाधव व त्यांच्या पथकाने आरोपी राज संतोष वाल्मिकी व रवींद्र राजेश अटवाल उर्फ हरीयाणी यांना अटक केली.


मा.सोनावणे साहेब कोर्ट

अर्जदाराचे वकील
श्री.सचिन बाबुराव कांबळे

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१५२०/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.०५/१२/२०२२

१) श्री.प्रभाकर लहू ठाकूर
वय : ५४ वर्षे, व्यवसाय : धंदा
२) श्री.गणेश लहू ठाकूर
वय : ४७ वर्षे, व्यवसाय : धंदा
३) स्व.नागेश लहू ठाकूर-मयत-तर्फे वारस
३/१) श्रीमती.कार्तिकी नागेश ठाकूर
वय : ४१ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
३/२) कु.प्रणित नागेश ठाकूर
वय : २० वर्षे, व्यवसाय : शिक्षण
३/३) कु.अनुष्का नागेश ठाकूर
वय : १७ वर्षे, व्यवसाय : शिक्षण
(अ.क्र.३/३ चे अ.पा.क तर्फे तिची आई
कार्तिकी नागेश ठाकूर वरील सर्व रा.कोपरा गाव,
पो.खारघर, ता.पनवेल, जि.रायगड) अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाला

सदर प्रकरणी जाहीर नोटीस प्रकाशित करणे आवश्यक असलेमुळे सर्व लोकांस असे कळविण्यात येत आहे की, सदरचा अर्ज हा वारस दाखला मिळणेकरिता वरील अर्जदार दाखल करीत आहेत. अर्जदार नं.१ ते ३ यांची आई व अर्जदार नं.३/१ यांची सासुबाई आणि अर्जदार नं.३/२ व अर्जदार नं.३/३ यांची आजी स्व.यमुनाबाई लहू ठाकूर हे कोपरा गाव, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथे दि.०५/०६/२०२२ रोजी मृत्यू पावले आहेत. तसेच अर्जदार नं.१ ते ३ यांचे वडील व अर्जदार नं.३/१ यांचे सासरे आणि अर्जदार नं.३/२ व अर्जदार नं.३/३ यांचे आजोबा स्व.लहू गणपत ठाकूर हे न.मुं.म.पा. रुग्णालय, वाशी ता.जि.ठाणे येथे दि.०८/०१/२००७ रोजी मृत्यू पावले आहेत व अर्जदार नं.१ ते २ यांचे भाऊ व अर्जदार नं.३/१ यांचे पती आणि अर्जदार नं.३/२ व अर्जदार नं.३/३ यांचे वडील स्व.नागेश लहू ठाकूर हे कोपरा गाव, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथे दि.२१/१०/२०१९ रोजी मृत्यू पावले आहेत. अर्जदार हेच स्व.लहू गणपत ठाकूर स्व.यमुनाबाई लहू ठाकूर व स्व.नागेश लहू ठाकूर यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत वारसांची नोंद होणे आवश्यक आहे.

अर्जदारांचे अर्जदार नं.१ ते ३ यांचे वडील व अर्जदार नं.३/१ यांचे सासरे आणि अर्जदार नं.३/२ व अर्जदार नं.३/३ यांचे आजोबा स्व.लहू गणपत ठाकूर यांचे मृत्यूसमयी व आजमितीस त्यांचे नावे असलेली मौजे : तळोजा पाचनंद, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथे पुढील वर्णनाची मिळकत सरकारतर्फे भूसंपादीत झाली आहे.

**मौजे : खारघर, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड**

| युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|---|
| १५० | १०२ | ५ | ०-०२-८ | ०.०४ |
| - | १०२ | १ | ०-०५-१२ | ०.०४ |
| - | १०२ | ३ | ०-०६-० | ०.०४ |
| २०० डी | १९० | ४ | ०-०६-० | १.४४ |
| ४०७ ए | २११ ए | १ | ०-३२-४ | ४.३१ |
| ३३५ | १०२ | ६ | ०-२०-० | २.८७ |
| - | १५५ | ११ | ०-०२-४ | ०.३९ |
| ४०५ | १० | ५ | ०-१७-४ | ३.८७ |
| - | ८ | ३+५+८+९+१० / २ | ०-३७-८ | १.१३ |

सदर मिळकतीबाबत शासकीय योजनेप्रमाणे साडेबारा टक्के भूखंड मिळणार आहेत. स्व.लहू गणपत ठाकूर व स्व.यमुनाबाई लहू ठाकूर आणि स्व.नागेश लहू ठाकूर यांचे कायदेशीर वारस म्हणून वरील अर्जदारांची नोंद होणेकरिता आवश्यक असलेला वारस दाखला मिळणेसाठी सदरचा चौकशी अर्ज नं.१५२०/२०२२ नामदार कोर्टात दाखल केला आहे.

तरी वर उल्लेख केलेले मिळकती संबंधी इतर कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी स्वतः किंवा त्यांचे वकीलांमार्फत ही नोटीस प्रकाशित झालेपासून ३० दिवसांचे आत कागदोपत्री पुराव्यासह या कोर्टात हजर रहावे.

जर कोणी वर उल्लेख केलेप्रमाणे हजर राहून हरकत न घेतलेस सदर न्यायालय वरील अर्जाचे संदर्भात योग्य तो हुकूम करील.

माझे सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी आज दि.२/११/२०२२ रोजी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**


# कॉंग्रेस भवन सभागृहात दिवंगत नेत्यांच्या प्रतिमा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

रायगड जिल्हा कॉंग्रेसच्या अध्यक्ष पदाची धुरा सांभाळल्यापासून महेंद्रशेठ घरत हे रायगड जिल्ह्यात कॉंग्रेसचे गतवैभव प्राप्त करण्याचे प्रयत्न करत आहेत. त्यासाठी युवक, महिला, जेष्ठ कार्यकर्ते या सर्वांना सोबत घेऊन पक्ष वाढवण्याचे प्रयत्न करत आहेत.



त्याचबरोबर जेष्ठ नेते ज्यांनी कॉंग्रेस पक्षासाठी आयुष्य खर्च केले अशा दिवंगत नेत्यांकडून नेहमीच प्रेरणा मिळावी यासाठी दिवंगत नेत्यांच्या कॉंग्रेस पक्ष जिल्हा मुख्य कार्यालय अलिबाग येथे प्रतिमा असाव्यात अशी त्यांची मनोमन इच्छा होती. मंगळवार दिनांक १ नोव्हेंबर २०२२ रोजी रायगड जिल्हा कॉंग्रेस कमिटीच्या आढावाबैठकी नंतर दिवंगत माजी आमदार माणिकराव जगताप, दिवंगत माजी आमदार मधुशेठ ठाकूर तसेच दिवंगत कामगार नेते,श्याम म्हात्रे यांच्या प्रतिमा बॅरिस्टर अंतुले भवन, सभागृह अलिबाग येथे लावण्यात आल्या. यावेळी प्रदेश चिटणीस ॲड. प्रवीण ठाकूर, जिल्हा उपाध्यक्ष मिलिंद पाडगावकर, जिल्हा उपाध्यक्ष राजाभाऊ ठाकूर, महिला अध्यक्षा ॲड. श्रद्धा-ताई ठाकूर, जिल्हा उपाध्यक्ष किरीट पाटील, मच्छीमार संघटनेचे मार्तंड नाखवा,मानवाधिकार समितीच्या सौ. कविता ठाकूर,पनवेल तालुका अध्यक्ष-नंदाराज मुंगाजी, खालापूर तालुका अध्यक्ष कृष्णा पारंगे, पेण तालुका अध्यक्ष अशोक मोकल, माणगाव तालुका अध्यक्ष विलास सुर्वे, तळा तालुका अध्यक्ष शरद भोसले, मुरुड तालुका अध्यक्ष सुभाष महाडीक, सुधागड ता. अध्यक्ष बाबा कुलकर्णी, अलिबाग ता. अध्यक्ष भास्कर चव्हाण, माजी तालुका अध्यक्ष योगेश मगर, ॲड. के.एस. पाटील. आदी उपस्थित होते.

# अखेर मुरुडकरांना आनंदाचा शिधा मिळाला

**दै.रायगड नगरी । मुरुड**

अंत्योदय व दारिद्र्यरेषेखालील (बीपीएल) कार्डधारकांना शिंदे व फडणवीस सरकारकडून दिवाळीनिमित्त शिधा वाटपाची घोषणा करण्यात आली होती. सर्वसामान्य जनतेला सरकारकडून मिळणाऱ्या या आनंदाचा शिधा वाटपाला मुरुड शहरातील श्री स्वामी समर्थ रास्त भाव धान्य दुकान नंबर ३ या दुकानात सचिन कासेकर यांच्या हस्ते सुरुवात करण्यात आली. १५ दिवस सर्व्हर डाऊन मुळे अखेर ऑफ लाईन पद्धतीने सोमवारी मुरुड करांना आनंदाचा शिधा मिळाला आहे.

यावेळी शेकडो लाभार्थींनी दुकानात गर्दी केली होती. दिवाळीचा आनंदाचा शिधा शंभर रुपयात एक किलो साखर, एक किलो तेल, एक किलो रवा, एक किलो चणाडाळ या चार वस्तू पाकिटामध्ये देण्यात आल्या.

आनंदाचा शिधा पहिले ऑनलाईन पद्धतीने म्हणजेच पॉझ मशीनच्या माध्यमातून वाटप करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. परंतु, सतत पॉझ सर्व्हर डाऊन होत असल्याने शिधा वाटपाला उशीर होत होता. त्यामुळे ग्राहकांपर्यंत शिधा पोहोचू शकला नाही. त्यामुळे आता आनंदाचा शिधा ऑफलाईन पद्धतीने वाटप करायला सुरुवात करण्यात आली आहे.


मा.मुजावर सो.कोर्ट

अर्जदारांतर्फे वकील
ॲड.जितेंद्र कुमार पांडे

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (क.स्तर) यांचे कोर्टात
चौ.अर्ज क्रं.८४७/२०२१
नि.नं.१८
ने.ता.०९/११/२०२२

श्रीमती.योगिता सुधाकर पाटील व इतर ३ अर्जदार
वय : ४२ वर्षे, धंदा : व्यवसाय
रा.फ्लॅट नं.३०२, ओम नम शिवाय को.ओ.हौ.सो.,
प्लॉट नं.२१, सेक्टर १६, कळंबोली, नवी मुंबई
ता.पनवेल, जि.रायगड ४१०२१८ अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाले

तमाम जनतेस या नोटीसद्वारे कळविण्यात येत आहे की,

१) अर्जदाराचे पती कै.सुधाकर गजानन पाटील हे एम.जी.एम. हॉस्पिटल कामोठे, ता.पनवेल येथे दि.०८/०३/२०२० रोजी मरण पावले. अर्जदार हे त्यांचे वारस आहेत.

२) मृत्यूसमयी कै.सुधाकर गजानन पाटील यांच्या नोव कळंबोली, नवी मुंबई, पनवेल महानगरपालिका हद्दीत खालील वर्णनाची मिळकत होती. त्यांचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**स्थावर मालमत्ता**
**फ्लॅट नं.३०१, ३०२, ३०४, ओम नम शिवाय को.ओ.हौ.सो., प्लॉट नं.२१, सेक्टर १६, कळंबोली, नवी मुंबई, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२१८**

अर्जदार हे कै.सुधाकर गजानन पाटील यांचे वारस आहेत. वरील मिळकत ही मयत सुधाकर गजानन पाटील यांनी विकत घेतली होती. आता ती अर्जदारास त्याच्या नावे करायची आहे. म्हणून सिडको / पनवेल महानगरपालिका ऑथरिटीने मे.कोर्टाकडून वारस दाखला मागितला आहे. यासाठी अर्जदाराने कोर्टात अर्ज दाखल केला आहे. ज्या कुणीही व्यक्तला याबाबतीत हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून या कोर्टात १ महिन्याच्या आत हजर राहून किंवा वकीलांमार्फत हरकत घ्यायची आहे. योग्य मुदतीत हरकत आली नाही तर मे.कोर्ट हक्काबद्दल पुरावा घेण्याची कारवाई करेल आणि जर अर्जार हे कै.सुधाकर गजानन पाटील यांचे वारस आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना वारस दाखला मंजूर करण्यात येईल याची नोंद घ्यावी. आज दि.०१/११/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.क.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.क.स्तर, पनवेल**


# एलिफंटा बेटावरील किनाऱ्यावर ३५ फुटी लांबीचा ८ टन वजनाचा मृत व्हेल मासा



**दै.रायगड नगरी । उरण**

एलिफंटा बेटावरील किनाऱ्यावर सुमारे ३५ फुटी लांबीचा मृत व्हेल मासा वाहात आला आहे.एलिफंटा बेटावरील शेतबंदर जेट्टीच्या बाजूला काल समुद्राच्या लाटांनी हा अवजड मृत व्हेल मासा किनाऱ्यावर पोहोचला आहे. ३५ लांबीचा व सुमारे ८ - ९ टन वजनाचा मृत व्हेल माशांची विल्हेवाट लावण्यासाठी वनविभागाचे अधिकारी आरएफओ नथुराम कोकरे हे त्यांच्या कर्मचाऱ्यांसह बेटावर पोहचले आहेत.

अगदी सडलेल्या अवस्थेत आढळलेल्या सुमारे ८ - ९ टन इतक्या अवजड मृत व्हेल माशाची विल्हेवाट लावण्याची जिकरिचे काम करण्यासाठी सध्या तरी बेटावर कोणतीही साधने सामुग्री उपलब्ध नाही.त्यामुळे विल्हेवाट कशी लावायची या विवंचनेत वन अधिकारी पडले आहेत.

दफन करण्यासारखे स्थिती नसल्याने व दफनासाठीही यंत्र सामग्री, मनुष्यबळही उपलब्ध नसल्याने मृत व्हेल माशाची विल्हेवाट लावण्यासंदर्भात वरिष्ठांसोबत चर्चा सुरू असल्याची माहिती आरएफओ नथुराम कोकरे यांनी दिली आहे.


मे.वाघमारे सो

ॲड.सुदेश केणे

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे न्यायालयात
रे.मु.नं.७४/२०२२
नि.नं.१९
ने.ता.२८/११/२०२२

अनंता रामदास पाटील वादी
विरुद्ध
किशोर नामदेव पन्हाळे व इतर प्रतिवादी
प्रति,

१) किशोर नामदेव पन्हाळे, २) संतोष नामदेव पन्हाळे, ३) मनोज नामदेव पन्हाळे, ४) विजया बाळकृष्ण किरवे, ५) सुलोचना वसंतराव कर्वे, ६) जयश्री सुभाष खेळदे, ७) उज्वला विजय खांदे, ८) राजश्री चंद्रकांत देशमाने

(रा.आदई, ता.पनवेल, जि.रायगड)

ज्याअर्थी वादी अनंता रामदास पाटील यांनी तुमच्या विरुद्ध या न्यायालयात वाद दाखल केलेला आहे. म्हणून सदर दाव्याच्या संबंधात आपले म्हणणे मांडण्यासाठी दि.२८/११/२०२२ रोजी १०.३० वाजता या न्यायालयात आपण जातीने किंवा ज्यास योग्यरित्या सुचना दिलेल्या आहेत व जे वादासंबंधीच्या सर्व महत्वाच्या प्रश्नांची उत्तरे देवू शकणारी व्यक्ती त्यांच्या बरोबर असले अशा वकीलांमार्फत हजर होण्यासाठी तुम्हाला याद्वारे बोलाविण्यात येत आहे व तुमच्या हजेरीसाठी ठरलेल्या दिवशी वादाच्या अंतिम निर्णयासाठी नेमलेला दिवस असल्यामुळे बचावाच्या पृष्ट्यार्थ तुम्ही ज्या साक्षीदारांच्या साक्षीच्या व ज्या दस्तऐ-वजाचा आधार घेवू इच्छिता ते सर्व साक्षीदार व सर्व दस्ताऐवज त्या दिवशी हजर करण्याची तुम्हाला तयारी ठेवावी लोल. तुम्हाला नोटीस देण्यात येत आहे की, उपरोक्त दिवशी हजर न राहिल्यास तुमच्या गैरहजेरीत वादाची सुनावणी होवून निर्णय दिला जाईल.

आणखी अशी नोटीस देण्यात येत आहे की, वर नमूद केलेल्या तारखेस किंवा तत्पूर्वी बजावणीकरिता तुमचा पत्ता दाखल करण्यात तुम्ही कसूर केल्यास तुमचा बचाव रद्द करण्यास पात्र ठरेल. सदरची नोटीस ऑ ५ रुल २० प्रमाणे आहे.

आज दि.२/११/२०२२ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सदरहू नोटीसची/समन्स बजावणी ऑ.५ रु.२० प्रमाणे करण्यात यावी.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# संक्षिप्त...

## ४२ वर्षीय इसम बेपत्ता

दै.रायगड नगरी । पनवेल

आयआरबी कंपनीचे रूम, अजीवली येथून कोणाला काहीही न सांगता ४२ वर्षीय चरवा सोमरा उरॉव हा निघून गेला आहे. त्यामुळे तो हरवला असल्याची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

त्याची उंची पाच फूट, सात इंच, केस काळे, पांढरे आहेत. त्याचा बांधा मध्यम असून अंगात पिवळ्या रंगाचा हाफ टी-शर्ट व काळ्या रंगाचा हाफ बर्मुडा घातला आहे. त्याला हिंदी भाषा बोलता येते. या इसमाबाबत अधिक माहिती असल्यास पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस हवालदार धनाजी तांडेल यांच्याशी संपर्क साधावा.

## निवृत्तीवेतनधारकांनी हयातीचे प्रमाणपत्र सादर करावे : रमेश इंगळे

दै.रायगड नगरी । अलिबाग

शासनाच्या ज्या निवृत्तीवेतनधारकांना रायगड जिल्हा कोषागाराकडून निवृत्तीवेतन प्रदान केले जाते अशा सर्व निवृत्तीवेतनधारकांनी दि.१ नोव्हेंबर २०२२ रोजी हयात असल्याबाबतचे हयात प्रमाणपत्र (डळशष उशीींळषळ-लरींश) दि.१ ते दि.३० नोव्हेंबर २०२२ या कालावधीत सादर करावेत, असे आवाहन रायगड जिल्हा कोषागार अधिकारी रमेश इंगळे यांनी केले आहे.

निवृत्तीवेतनधारकाचे हयात प्रमाणपत्र विहित मुदतीत कोषागारात प्राप्त झाल्याशिवाय पुढील निवृत्तीवेतन प्रदान केले जाऊ शकत नाही. बँकेमार्फत निवृत्तीवेतन घेणाऱ्या निवृत्तीवेतनधारकांनी कोषागार कार्यालयाकडून संबंधित बँकेकडे पाठविण्यात आलेल्या घोषणापत्रावर स्वतः हयात असल्याबाबत बँक व्यवस्थापक यांच्या समक्ष दिनांकित स्वाक्षरी करावी. ही घोषणापत्रे संबंधित बँकांकडे पाठविण्यात आलेली आहेत. पुनर्नियुक्त/ पुनर्विवाह केलेल्या कुटुंब निवृत्तीवेतन / निवृत्तीवेतनधारकांकरिता नियमित नमुना वापरावा.


### वाचकांना विनम्र सूचना

दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकुराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.


# मच्छिमारांच्या मागण्या मान्य न झाल्यास सागरी आंदोलन छेडण्याचा इशारा

## समुद्रात येणाऱ्या जहाजांना अडवणार ; दिघी पोर्टला इशारा



दै.रायगड नगरी । मुरुड

मुरुड तालुक्यातील अदानी दिघी पोर्टचे सुरू असलेले काम बेकायदेशीर आहे. येथील स्थानिक मच्छिमारांची दिघी पोर्ट प्रशासनाने फसवणूक केली आहे. मच्छिमारांच्या जागेवर अतिक्रमण करून जागा बळकाविली असून, त्याबदल्यात योग्य मोबदलाही दिलेला नाही. याबाबत अनेकदा पत्रव्यवहार करूनदेखील प्रशासनाकडून कोणताही प्रतिसाद मिळालेला नाही. व्यवस्थापनाच्या या आडमुठ्या भूमिकेविरोधात शेकडो यांत्रिक नौकांसह समुद्रात आंदोलन करून अदानींचे एकही जहाज किनाऱ्याला लागू देणार नाही, असा खरमरीत इशारा महाराष्ट्र राज्य मच्छिमार संघ, मुंबई संचालक तथा श्री महालक्ष्मी मच्छिमार सोसायटी राजपुरीचे चेअरमन विजय गिदी यांनी अदानी पोर्टला दिला आहे.

यावेळी ते म्हणाले की, अदानी पोर्ट दिघी येथे काम सुरू असून त्याविरोधात शेकडो मच्छिमारांनी वेळोवेळी एल्गार केला आहे. स्थानिक मच्छिमारांवर होत असलेल्या अन्यायाविरोधात ८ फेब्रुवारी २०२१ ३१ ऑक्टोबर २०२२ मा कालावधीत तब्बल १३ पत्रव्यवहार करण्यात आला असून, येथील मच्छिमारांच्या प्रश्नांची जाणीव त्यांना करून दिली आहे. परंतु, आजतागायत एकाही पत्राला उत्तर देण्याची तसदी दिघी पोर्ट प्रशासनाने घेतलेली नाही. दिघी पोर्टचे काम अद्याप सुरु असून, मोठ-मोठी जहाजेपर्यंत येण्यासाठी त्याठिकाणी समुद्रात खोलीकरण करण्यात येत आहे. त्यासाठी मोठ्या प्रमाणात उत्खनन करण्यात येत आहे.

दरम्यान, उत्खनन सुरू असताना स्थानिक आर्थिक नुकसान आले आहे. आधीच मत्स्यदुष्काळामुळे हवालदिल झालेल्या मच्छिमारांवर उपासमारीची वेळ आली आहे. यामध्ये लक्ष्मण नारायण नागोर यांचे १० हजारांचे तर जयनारायण आगरकर यांचे १९ हजारांच्या सामानाचे नुकसान झाले आहे. त्याची भरपाई अद्याप पोर्ट प्रशासनाने दिलेली नाही. ही भरपाई तात्काळ देण्यात यावी, अशी मागणी आम्ही वेळोवेळी प्रशासनाकडे लावून धरी असताना याकडे व्यवस्थापनाने दुर्लक्ष चालविलेले आहे. त्यामुळे मच्छिमारांमध्ये याविरोधात तीव्र संतापाची आहे.

समुद्रात होत असलेल्या उत्खननामुळे मच्छिमारांची ही जागा नष्ट होत असून, मासेमारीतून मिळणारी पापलेटलेट कोलंबी, जिताडा, रावस तसेच खाडी किनारी मिळणारी कालवे, शिपल्या आदी प्रकारची मिळणारी मच्छी गायब झाली असून मोठे नुकसान झाले आहे. त्यामुळे त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली असून, कुटुंबाचा उदरनिर्वाह करनेदेखील कठीण झाले आहे.

याबाबत पोर्ट प्रशासनाविरोधात आवाज उठावला असून, प्रत्येक वेळी धातुरमातुर आश्वासन देऊन आमचा आवाज दाबण्याचा प्रयत्न झाला आहे. असा आरोप गिदी यांनी केला आहे.

दरम्यान, २७ ऑक्टोबर रोजी सागरी आंदोलनाचा इशारा देण्यात आल्यानंतर २८ ऑक्टोबर रोजी पोर्ट प्रशासनाने स्थानिक मच्छिमारासोबत बैठक लावली १५ दिवसांच्या आत सामंजस्य कराराबाबत निर्णय घेण्यात येईल, असे आश्वासन स्थानिक पोर्ट प्रशासनाकडून देण्यात आले आहे.

२३ ऑगस्ट रोजी पोर्ट प्रशासनाबरोबर सामंजस्य करार करण्यासंदर्भात निवेदन देण्यात आले आहे. त्यामध्ये प्रत्येक कुटुंबास पात्रतेनुसार नोकरी मिळावी, शेतकऱ्यांप्रमाणे प्रकल्पग्रस्त म्हणून दाखला मिळावा. चॅनलची मार्गीका स्थिर करावी, खाडीमध्ये उत्खनन करण्याअगोदर संस्थेस कळविण्यात यावे. अशा प्रकारच्या २३ मागण्यांचा समावेश आहे. त्या मागण्या तात्काळ मान्य करण्यात याव्यात असेही गिदी यांनी सूचित केले आहे. आगरदांडा टर्मिनलचे काम थोड्याच दिवसा सुरू होणार असल्याचे समजले आहे. परंतु या टर्मिनलचे समुद्रामध्ये लांबी-रुंदीचा भराव किती असेल, ते अद्याप समजलेले नाही. त्यामुळे मच्छिमारांकरिता असलेली समुद्रातील जागा कमी होणार आहे. हे होणारे अतिक्रमण थांबवा अन्यथा आम्ही काम बंद पाडू जर भरावरून जागा वाढत असेल तर जागेचा मोबदला स्थानिक मच्छिमांना मिळावा, अशी मागणी विजय गिदी यांनी केली आहे.

## ३२ वर्षीय इसमाने केली आत्महत्या

दै.रायगड नगरी । पनवेल

कळंबोली येथील स्टील अथॉरिटी ऑफ इंडिया लिमिटेड या केंद्र सरकारच्या स्टीलच्या गोदामात ताराचंद लॉजिस्टक्सचे सुपरवाझर किशोर सकपाळ (वय ३२ ) यानी आत्महत्या केली आहे.

या गोदामात ७०० च्या वर माथाडी कामगार काम करत असून ठेकेदारी पद्धतीने ३०० च्या आसपास कामगार काम करत आहेत. कामाचा जास्त लोड असल्यामुळे सर्व माथाडी कामगार आपल्या कामात व्यस्त होते. रात्री ऑफिसमध्ये कोणी नाही हे पाहून सोमवारी ( ३१ ऑक्टोबर) रोजी पहाटे किशोर यानी फॅनला दोरी बांधून गळफास घेतला. आत्महत्या करण्याचे कारण अद्याप समजले असून तपास सहाय्यक पोलिस निरीक्षक दिनेश पाटील करत आहेत.

## सरपंच रामेश्वर आंग्रे यांच्या माध्यमातून तीर्थयात्रेची मोफत सेवा

दै.रायगड नगरी । पनवेल

करंजाडे ग्रामपंचायतीचे सरपंच रामेश्वर आंग्रे यांच्या माध्यमातून करंजाडे वसाहतीतील जेष्ठ नागरिकांना दरवर्षीप्रमाणे यंदाही मोफत तीर्थयात्रा पर्यटनाची सेवा देण्यात आली आहे. सोमवारी (दि.३१ ऑक्टोबर) रात्री १० वाजता करंजाडे वसाहतीतून जेष्ठ नागरिकांच्या दोन बस गाड्या तीर्थयात्रेसाठी रवाना झाल्या आहेत. यावेळी सरपंच रामेश्वर आंग्रे यांनी जेष्ठ नागरिकांच्या तीर्थयात्रेची सर्व उत्तम व्यवस्था करून प्रवासासाठी शुभेच्छा दिल्या.

जवळपास शंभर जेष्ठ नागरिक या तीर्थयात्रेत सहभागी झाले आहेत. आज (मंगळवार दि.२ ऑक्टोबर) कोल्हापूर येथील महालक्ष्मी मंदिर येथे दर्शन घेऊन त्यानंतर वाडी रत्नागिरी येथील श्री क्षेत्र ज्योतिबा मंदिर, पन्हाळगड, श्री क्षेत्र बाळूमामा, नरसोबाची वाडी, कणेरी मठ, सातारा पाली खंडोबा देवस्थान याठिकाणी तीर्थयात्रा केली जाणार असून ४ नोव्हेंबरला करंजाडे येथे यात्रा संपन्न होणार आहे. या तीर्थयात्रेत ४० पुरुष व ६० महिला याप्रमाणे १०० जेष्ठ नागरिक सहभागी झाले असून सर्व जेष्ठ नागरिक सरपंच रामेश्वर आंग्रे यांना धन्यवाद देत आहेत.



## सुनील कविस्कर यांचा बाळासाहेबांच्या शिवसेनेत प्रवेश



दै.रायगड नगरी । महाड


महाडचे माजी नगराध्यक्ष सुनिल कविस्कर यांनी मंगळवारी बाळासाहेबांच्या शिवसेनेत प्रवेश केला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांचे पक्षात स्वागत केले. सुनिल कविस्कर यांच्या या प्रवेशामुळे महाड शहरात बाळासाहेबांची शिवसेना भक्कम झाली आहे.

सुनिल कविस्कर यांची राजकीय कारकीर्द शिवसेनेतून सुरु झाली. शिवसेनेतर्फे नगरसेवक म्हणून निवडून आल्यानंतर, त्यांना शहराचे नगराध्यक्षपद भूषविण्याची संधी मिळाली. कालांतराने त्यांनी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेत प्रवेश केला. या पक्षाकडूनही ते नगरसेवक म्हणून निवडून आले. मनसेनंतर त्यांनी कॉंग्रेस पक्षात प्रवेश केला. या पक्षाकडून नगरसेवक म्हणून निवडून आल्यानंतर, कॉंग्रेस पक्षानेही त्यांना नगराध्यक्षपद भूषविण्याची संधी दिली. कॉंग्रेसमध्ये असतानाच, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या पक्षप्रवेश कार्यक्रमात त्यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षात प्रवेश केल्याचे जाहीर करण्यात आले होते. मात्र, या पक्षात ते फार काळ रमले नाहीत. अखेर त्यांनी बाळासाहेबांच्या शिवसेनेत प्रवेश करण्याचा निर्णय घेतला. काल (मंगळवारी) राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे तापोळा (महाबळेश्वर) येथील आपल्या मूळ गावी आले असता, तेथे त्यांची भेट घेवून सुनिल कविस्कर यांनी बाळासाहेबांच्या शिवसेनेत प्रवेश केला. त्यांचे अनेक समर्थक देखील यावेळेस बाळासाहेबांच्या शिवसेनेत दाखल झाले. यावेळेस महाडचे आमदार भरतशेठ गोगावले, जिल्हा प्रमुख प्रमोद घोसाळकर, उपजिल्हा प्रमुख विजय सावंत,तालुका प्रमुख सुरेश महाडिक, शहर प्रमुख नितीन पावले, शहर संघटक सिध्देश पाटेकर, शहर संघटक निखिल शिंदे उपस्थित होते.

# सात उघडी यशवंती खारभूमीचे दरवाजे पुन्हा तुटले

दै.रायगड नगरी । शिस्ते

श्रीवर्धन तालुक्यातील शिस्ते - दिवेआगर मार्गावरील यशवंती खारभूमीलगत असणाऱ्या खाडीचे चे दरवाजे तुटल्याने समुद्राच्या भरतीचे पाणी शेतात घुसू लागले होते. त्यामुळे शेतकऱ्यांना गेली तीन वर्षे भातशेतीला मुकावे लागत आहे. यंदाही हातातोंडाशी आलेली भातशेती तुटलेल्या दरवाजांमुळे खराब होत चालली आहे.



दिवेआगर खाडी लगत बोर्लीपंचतन परिसरातील ४ ते ५ गावांतील अनेक शेतकऱ्यांची साधारण ३५० हेक्टर क्षेत्रात खारशेती जमीन आहे. त्यात शेतकरी दरवर्षी भातशेतीचे उत्पन्न घेतात. समुद्राच्या खाडीतून शेतात समुद्राचे पाणी जाऊ नये यासाठी भक्कम दरवाजे असलेली 'सात उघडी' आहे. मात्र, गेली सलग तीन चार वर्षे उधाणाच्या भरतीमुळे हे दरवाजे उध्वस्त झाले. त्यामुळे शेतकऱ्यांची शेकडो हेक्टर शेतजमीन पाण्याखाली जाते. पावसाळ्यात तर ही परिस्थिती गंभीर असते. हाताशी आलेली पिके उधाणाच्या पाण्यामुळे नष्ट होतात. याबाबतीत अनेक वेळा स्थानिक लोकप्रतिनिधींना सांगितले मात्र ठोस उपाययोजना झालीच नाही. खारभूमी सर्व्हे क्षण व अन्वेक्षण विभागाकडून चार महिन्यांपूर्वी नवीन झडपे लावली मात्र लाकडी दरवाजा असल्याने पाण्याच्या जोरदार प्रवाहात तुटून गेले. शेतकऱ्यांसाठी शेतकऱ्यांची संघटित संघटन नसल्याचा फटका बसत आहे. यावेळी स्वप्नील तुपे म्हणाले की, तात्पुरती व्यवस्था म्हणून यशवंती खारभूमी योजनेत लाकडी दरवाजे लावले होते. मात्र भविष्यात शेतीचे नुकसान होणार नाही यासाठी कायमस्वरूपी उपाय म्हणून एफआरपी अर्थात फायबर चे दरवाजे लावण्यासाठी आम्ही प्रयत्न करत आहोत. पुढील वर्षी तसे दरवाजे लावू. सध्या अंदाजपत्रक बनवण्याचे काम सुरु आहे. खारलँड चा मासेमारी साठी लिलाव होतो व तेथील दुरुस्ती कडे लक्ष देण्याची जबाबदारी लिलावधारक शेतकऱ्यांची असते. मासेमारी लिलाव हा येथील जमीनधारकाला दिला जातो. तर संतोष कांबळे म्हणाले की, खाडीच्या पाण्यामुळे माझी संपूर्ण शेती ची नासाडी होत आहे. संबंधित विभागाच्या तात्पुरत्या दरवाजांमुळे काही उपयोग होत नाही त्यासाठी खाऱ्या पाण्यात टिकतील असे दरवाजे हवेत.

## ३२ वर्षीय इसमाने केली आत्महत्या


दै.रायगड नगरी । पनवेल

कळंबोली येथील स्टील अथॉरिटी ऑफ इंडिया लिमिटेड या केंद्र सरकारच्या स्टीलच्या गोदामात ताराचंद लॉजिस्टक्सचे सुपरवाझर किशोर सकपाळ (वय ३२ ) यानी आत्महत्या केली आहे.

या गोदामात ७०० च्या वर माथाडी कामगार काम करत असून ठेकेदारी पद्धतीने ३०० च्या आसपास कामगार काम करत आहेत. कामाचा जास्त लोड असल्यामुळे सर्व माथाडी कामगार आपल्या कामात व्यस्त होते.

रात्री ऑफिसमध्ये कोणी नाही हे पाहून सोमवारी ( ३१ ऑक्टोबर) रोजी पहाटे किशोर यानी फॅनला दोरी बांधून गळफास घेतला. आत्महत्या करण्याचे कारण अद्याप समजले असून तपास सहाय्यक पोलिस निरीक्षक दिनेश पाटील करत आहेत.


## पाणजे येथील पारंपारीक मत्स्य शेतकऱ्यांकडून तहसिलदारांचे आभार

दै.रायगड नगरी । उरण

मळगंगा मत्स्य शेतकरी उत्पादक सहकारी संस्था. मर्या, पाणजे च्या मत्स्य शेतकऱ्यांनी उरणचे तहसिलदार भाऊसाहेब अंधारे यांची उरण तहसिलदारांच्या दालनात भेट घेतली. शासनाच्या विविध योजना पारंपारीक मत्स्य शेतकऱ्यांना मिळाव्या यासाठी त्यांनी केलेल्या मार्गदर्शनाबाबत त्यांचे आभार मानले.

उरण तालुक्यात होत असलेल्या विकास कामांमूळे व आलेल्या विविध प्रकल्पांमूळे स्थानिक पारंपारीक मत्स्य शेतकरी देशोधडीला लागला आहे.त्यांचा परंपरागत व्यवसायावर गधा आली आहे.याच संदर्भात उरण मधील पाणजे येथील पारंपारीक मत्स्य शेतकऱ्यांनी शासनाकडून नुकसानभरपाई मिळण्या संदर्भात त्यांनी उरणचे तहसिलदार भाऊसाहेब अंधारे यांची काही दिवसापूर्वी भेट घेतली होती.त्यावेळी भाऊसाहेब अंधारे यांनी त्यांना शासनाच्या विविध योजना मिळण्यासाठी मत्स्य शेतकरी उत्पादक सहकारी संस्था. मर्या, तयार करण्यासंदर्भात मार्गदर्शन केले होते.

या शेतकऱ्यांनी तहसिलदारांच्या मार्गदर्शना नुसार मळगंगा मत्स्य शेतकरी उत्पादक सहकारी संस्था. मर्या, पाणजे ची स्थापना केली. त्या



संस्थेचे नोंदणी प्रमाण पत्र आल्यावर सर्व मत्स्य शेतकऱ्यांनी तहसिलदारसाहेबांची भेट घेवून आभार व्यक्त केले. या वेळी मळगंगा मत्स्य शेतकरी उत्पादक सहकारी संस्था मर्या.पाणजे चे चेरमन विजय पाटील, सेक्रेटरी अविनाश पाटील,सदस्य लखपती पाटील सदस्यां स्वाती पाटील, कविता पाटील,उमेश पाटील ईत्यादी उपस्थित होते.

## माथेरान रेल्वे स्थानकात कचराकुंड्या दिखाव्यापुरताच



दै.रायगड नगरी । माथेरान

देशातील सर्वच रेल्वे स्टेशन भागात स्वच्छतेची काळजी घेतली जात असताना माथेरान सारख्या सुंदर पर्यटनस्थळावर रेल्वे स्टेशन भागात रेल्वेचे वरिष्ठ अधिकाऱ्यांचे आगमन होते त्याचवेळी केवळ दिखाव्यापुरताच कचराकुंड्या लावण्यात येतात. नंतर अधिकारी माघारी गेल्यावर ताबडतोब काढून ठेवल्या जातात. नुकताच दिवाळीच्या सुट्टीच्या हंगामात सुध्दा कचराकुंड्या नसल्याने पर्यटकांना आपल्या जवळील कचरा स्टेशन भागात टाकण्याशिवाय पर्याय उपलब्ध नव्हता. नगरपरिषदेच्या माध्यमातून सुध्दा याठिकाणी कचराकुंडी लावण्यात आलेली आहे परंतु त्याकडे लक्ष जात नसल्याने कुठेही कचरा टाकला जात आहे. स्टेशन मधील अधिकारी वर्गाच्या गलथान कारभारामुळे पर्यटकांमधून नाराजी व्यक्त केली जात आहे.

## श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्याजवळील अवधूत मंदिर परिसर बनलाय घोडा गाड्यांचा अड्डा

### उत्तर कार्य करण्यासाठी नागरिकांनी बसायचे कुठे?

दै.रायगड नगरी । श्रीवर्धन

श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्याला लागूनच मठाचा गवंड नावाचा एक परिसर आहे. या ठिकाणी स्मशानभूमी असून नगरपरिषदेने नुकतीच या ठिकाणी गॅस शवदाहिनी देखील बसविली आहे. याच मठाच्या गवंडामध्ये अवधूताचे मंदिर देखील आहे. याच अवधूत मंदिराच्या परिसरामध्ये श्रीवर्धन शहरामधील मृत व्यक्तींची उत्तर कार्य करण्याची पूर्वापार प्रथा आहे.

हिंदू समाजातील कोणत्याही जातीतील व्यक्ती मरण पावल्यास त्याचे दहावे व इतर कार्य अवधूत मंदिर परिसरात केले जाते. मात्र मागील काही दिवसांपासून अवधूत मंदिर परिसराला उभ्या करून ठेवलेला घोडा गाड्यांचा वेढा पडलेला आहे.

श्रीवर्धन पर्यटकांच्या पसंतीचे क्रमांक एकचे ठिकाण आहे. या ठिकाणी लाखो पर्यटक पर्यटनासाठी येत असतात. येणाऱ्या पर्यटकांना घोडा गाडीची सफर किंवा घोड्याची सफर करण्यासाठी या ठिकाणचे घोडा गाडीवाले नेहमीच तत्पर असतात. परंतु आपला दिवसभराचा धंदा उरकल्यानंतर घोडागाडी अवधूत मंदिर परिसरात उभी करून ठेवायची व घोडे मोकाट सोडून द्यायचे हा त्यांचा नित्यक्रम झालेला आहे. अवधूत मंदिर परिसरामध्ये चार ते पाच असलेल्या घोडागाड्यांमुळे उत्तर कार्यासाठी कोणीही नागरिक या ठिकाणी आले असल्यास उत्तर कार्य करण्यासाठी कुठे बसायचे? असा प्रश्न निर्माण होत आहे.

सदर अवधूत मंदिराची ९६ गुंठे जागा ही शासकीय असून त्या ठिकाणी नगरपालिकेचा कब्जा नसल्याने नगरपालिकेकडून या ठिकाणी अनधिकृतपणे उभ्या करण्यात आलेल्या घोडा गाडीवाल्यांवर कोणतीही कारवाई करण्यात येत नाही. तरी महसूल प्रशासनाने व पोलीस प्रशासनाने सदरचा परिसर घोडागाडी मुक्त करावा अशी मागणी श्रीवर्धन शहरातील नागरिकांकडून केली जात आहे.